महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**महत्वाचे परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२२-२३/गुणवत्ता यादी पडताळणी/ 1020
दिनांक : 01 MAR 2023

प्रति,
प्राचार्य / संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र
अभ्यासक्रमाच्या संस्था, पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया पुर्ण झालेल्या संस्थेनी आपल्या संस्थेच्या Login मधुन गुणवत्ता यादी confirm करणेबाबत..**

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र राज्य विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दि.१७.०८.२०१५
२) मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/२२२२/प्र.क्र.२०/प्रनिप्रा/१०५९२, दि.२४.११.२०२२
३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई याचे पत्र क्र.२अ/एडीएम/प्रवेशयादी पडताळणी/२०२२/३९७ दि.२९.११.२०२२
४) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिविकापु/शै.वि-३/२०२२-२३/गुणवत्ता यादी पडताळणी/७२१ दि.१०.०२.२०२३

उपरोक्त विषयांन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

सबब संदर्भ क्र. ०४ अन्वये या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतचे कामकाज **दि.१३.०२.२०२३ ते २७.०२.२०२३** या कालावधीत करण्यात आलेले आहे. ज्या संस्थेची प्रवेश पडताळणीची व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यता प्रक्रिया या कार्यालयाकडून पुर्ण झाली आहे अशा संस्थेनी दि.०२.०३.२०२३ पर्यंत आपल्या संस्थेच्या Login मधुन गुणवत्ता यादी confirm करावी.

तसेच ज्या संस्थेनी अद्याप या कार्यालयास पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची फाईल जमा करण्यात आलेली नाही अशा संस्थेस शेवटीची संधी म्हणून दि.०२.०३.२०२३ पर्यंत मुदत देण्यात येत आहे.

उपरोक्त कालावधीत प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यता प्रक्रिया पुर्ण न झाल्यास तसेच अधिनियम २०१५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही न झाल्यास, प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालय/प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही. मान्यता प्रदान न झाल्यास त्यास सर्वस्वी संस्था व संस्थाप्रमुख जबाबदार राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

( डॉ.द.व्यं.जाधव )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता